**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २२ जानेवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. राष्ट्रीय आरोग्य अभियान आणखी ५ वर्षं चालवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय.
2. दावोसच्या जागतिक आर्थिक गुंतवणूकदार परिषदेत दुसऱ्या दिवशी देखील राज्य सरकार मोठे करार करण्याची अपेक्षा.
3. शून्य अपघात मृत्युदर साध्य करण्यासाठी परिणामकारक उपाययोजना राबवा- मुख्यसचिव सुजाता सौनिक यांच्या सूचना, रस्तासुरक्षा संदर्भात घेतला नागपूर-अमरावती विभागाचा आढावा.
4. नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यात येणाऱ्या रनाळा गावचे सरपंच पंकज साबळे प्रजासत्ताक दिनी दिल्लीला विशेष अतिथी म्हणून आमंत्रित.
5. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुढील वर्षभर राज्यभरातल्या एसटीच्यासर्व बसस्थानकांवर 'स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान" राबवण्यात येणार.

-----------------------------------

**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाला पुढची पाच वर्षं मुदतवाढ देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी बैठकीनंतर वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत भारताने कोविड विरोधात मोठा लढा दिला. २२० कोटींहून अधिक कोविड प्रतिबंधक लसी देण्यात आल्या असं गोयल यांनी सांगितलं. भारताने गेल्या दशकभरात आरोग्य क्षेत्रात अनेक बाबतीत सुधारणा केल्या आहेत. बालमृत्यू, मातामृत्यूचं प्रमाण घटलं असून, क्षयरोगाविषयी जनजागृती करण्यात सरकारला यश आल्याचं गोयल म्हणाले. २०२५-२६ च्या हंगामासाठी कच्च्या तागाच्या किमान हमीभावात ६ टक्के वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याची माहिती पीयूष गोयल यांनी यावेळी दिली. तागाला ५ हजार ६५० प्रति क्विंटल इतका हमीभाव देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. हा हमीभाव लागवड खर्चापेक्षा ६७ टक्के अधिक असून याचा लाभ ईशान्य भारतातल्या ४० लाख कुटुंबांना होणार असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

-----------------------------------

**फडणवीस दावोस**

**दावोसमध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे उद्घाटन झाल्यानंतर मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात गुंतवणूकिचा पहिला करार गडचिरोलीसाठी करण्यात आला. कल्याणी समूहासोबत संरक्षण, स्टील, ईव्ही क्षेत्रासाठी हा करार झाला. यात गुंतवणूक 5200 कोटी रुपयांची असून 4000 रोजगार निर्मिती होणार आहे. यासोबतच गडचिरोली आणि नागपूर भागात स्टील, नवीनीकरणीय ऊर्जा, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम-आयर्न बॅटरिज, सोलर वेफर आणि सेल मॉड्युल्स इत्यादी क्षेत्रात कार्यरत जेएसडब्ल्यू या कंपनीसोबत 3 लाख कोटींचा सामंज्यस्य करार करण्यात आला आहे. यातून 10 हजार रोजगार उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. पहिल्या दिवशी करण्यात आलेल्या गुंतवणूक करार मध्ये हा सर्वाधिक रकमेच्या गुंतवणूकीचा करार आहे.**

***अतिशय आनंदाची गोष्ट आहे की जेएसडब्ल्यू ग्रुप श्री सज्जन जिंदलजी यांच्या सोबत एक मोठा एमओयू महाराष्ट्र सरकारने केलेला आहे. जवळपास तीन लाख कोटी रुपयांची इनवेस्टमेंट आहे. ज्याच्यामध्ये वेगवेगळे सेक्टर्स आहेत विशेषता गडचिरोलीला स्टील प्लांट असेल किंवा कम्प्लिट सोलर इंटिग्रेशन मेकॅनिझम असेल किंवा ई.व्ही चा प्लांट असेल छत्रपती संभाजीनगरला नागपूरला सोलार असेल अश्या वेगवेगळ्या पोर्टफोलिओमध्ये एक मोठी इनवेस्टमेंट याठिकाणी जेएसडब्ल्यू ग्रुपनी केलेली आहे. याच्यामुळे महाराष्ट्रातल औद्योगिक जे वातावरण आहे त्याला एक मोठा बुस्ट मिळणार आहे.***

**दावोस इथ आज दुसऱ्या दिवशी सुद्धा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करार होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल अनेक कंपन्यांच्या प्रमुखांच्या भेटी घेतल्या आणि त्यांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी निमंत्रित केलं.**

**------------------------------------**

**बेटी बचाओ, बेटी पढाओ'**

**'बेटी बचाओ'-'बेटी पढाओ' या अभियानाला आज दहा वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त दिल्लीत एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून त्यात सशस्त्र दल, निमलष्करी दल, दिल्ली पोलिस, विद्यार्थिनी आणि अंगणवाडी सेविकांच्या महिला अधिकारी सहभागी होतील. बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाचा भाग असलेल्या सुकन्या समृद्धी योजनेला देशात उत्तम प्रतिसाद मिळत असून, या योजनेत आतापर्यंत चार कोटीहून अधिक खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेत आठ पूर्णांक दोन दशांश व्याजदर दिला जातो. या अभियानात सर्व वर्ग सहभागी झाले असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी समाजमाध्यमातल्या संदेशाद्वारे म्हणाले.**

-----------------------------------

**निवडणूक आयोग**

निवडणूक काळात उत्तम कामगिरी केल्याबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्राला पुरस्कार जाहीर केला आहे. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. २०२४-२५ या वर्षासाठी महाराष्ट्रासोबत जम्मू आणि काश्मिर तसंच झारखंडलाही पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या शनिवारी, राष्ट्रीय मतदार दिनी नवी दिल्लीत हे पुरस्कार प्रदान केले जातील.

-----------------------------------

**मुख्य सचिव सुजाता सौनिक**

रस्ते अपघात टाळण्यासोबतच शुन्य अपघात मृत्युदर साध्य करण्यासाठी येत्या तीन वर्षाचाजिल्हानिहाय कृती आराखडा तयार करून प्रभावी आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी संबंधित विविध यंत्रणांना दिल्या. नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात, नागपूर आणि  अमरावती विभागातील रस्तेसुरक्षा तसेच अपघात नियंत्रणासाठी करावयाच्या उपाययोजना संदर्भात मुख्यसचिव सौनिक यांनी आढावा घेतला. रस्त्यावरील शुन्य अपघात मृत्युदर साध्य करण्यासाठी सेव्हलाईफ फाऊंडेशनसह विविध संस्थांसोबत वर्ष 2028 पर्यंतचा कृती आराखडा तयार करावा, असेही यावेळी त्यांनी सांगितले. रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रभावी आणि  परिणामकारक उपाययोजना राबवितांना सकाळी 6 ते 10 आणि रात्री 6 ते 9 यावेळात होणारे अपघात टाळण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच शहरातील गर्दीच्या ठिकाणी मार्गदर्शक फलक, अपघात प्रवण स्थळाच्या ठिकाणी रस्ते विभाजक, साईनबोर्ड तात्काळ लावावेत. वेग मर्यादा, हेल्मेट आणि सिटबेल्ट यासारख्या आवश्यक सूचना देतांनाच नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या सूचना करतांना मुख्यसचिव म्हणाल्या की,  विभागात महसूल पोलीस, परिवहन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे राबविण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे अपघातांचे  प्रमाण कमी झाले आहेत. अपघातानंतर गोल्डन अवरमध्ये वैद्यकीय सुविधा तसेच औषोधोपचारासाठी शासकीय रूग्णालयासोबतच खाजगी रूग्णालयातुनही उपचार उपलब्ध होईल यादृष्टीने अशा रूग्णालयांची नोंदणी करण्याला प्राधान्य देण्यात यावे अशी सूचना त्यांनी केली. प्रारंभी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.दिलीप भुजबळ, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी रस्ते अपघातासंदर्भात करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

-----------------------------------

**विशेष आमंत्रित सरपंच**

**नागपूर जिल्हयातील कामठी तालुक्यात येणाऱ्या रनाळा गावचे सरपंच पंकज साबळे यांना प्रजासत्ताक दिनी दिल्लीला विशेष अतिथी म्हणून निमंत्रण प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र राज्याकडून विविध क्षेत्रातून उल्लेखनीय उत्कृष्ट कार्य केलेल्या व्यक्तींची विशेष अतिथी म्हणून निवड करण्यात आली त्यामध्ये ग्रामपंचायत रनाळा इथले सरपंच पंकज साबळे आणि पत्नी स्वाती पंकज साबळे यांना निमंत्रित सहपरिवार निवड करण्यात आली आहे. दरम्यान, गावातील नागरिकांनी आपल्याला सेवा करण्याची संधी दिली आणि विविध योजनांची आपण यशस्वी अंमलबजावणी केली त्यामुळे ही संधी उपलब्ध झाल्याची भावना सरपंचांनी व्यक्त केली.**

***केंद्र सरकारद्वारे राबविण्यात आलेल्या योजना त्यामध्ये आयुष्मान भारत असो, हर घर जल हर घर नल असो, उज्ज्वला योजना अशा विविध योजना विश्वकर्मा योजना, प्रधानमंत्री आवास योजना टार्गेट आम्हाला केंद्र सरकारकडून येत होता हे टार्गेट १०० टक्के अचीव्ह करण्यामध्ये यशस्वी ठरलो आहोत.***

-----------------------------------

**स्वच्छ, सुंदर बसस्थानक**

**२३ जानेवारी रोजी बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुढील वर्षभर एसटीच्या राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर शिवसेना पक्षनेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून "हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान" राबवण्यात येणार आहे. तब्बल ३ कोटी रुपयांची बक्षिसे या अभियानांतर्गत वाटण्यात येणार असून राज्यात 'अ' वर्गात पहिल्या येणाऱ्या बसस्थानकाला १ कोटीचे बक्षीस जाहीर करण्यात येत आहे. अशी घोषणा राज्याचे परिवहन प्रताप सरनाईक यांनी केली आहे. या अभियानाची सुरवात २३ जानेवारी रोजी मंत्री सरनाईक यांच्या हस्ते कुर्ला नेहरूनगर बस स्थानकावर होणार आहे. यानिमित्ताने सर्व राज्यभर प्रत्येक बसस्थानकावर शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.**

-----------------------------------

**क्षयरोग**

**गोंदिया जिल्हयातील आयुष्मान आरोग्य मंदिर केसलवाडा इथं शंभर दिवसीय टीबी मुक्त भारत कार्यक्रम अंतर्गत निक्षय शिबीर संपन्न झाले. याशिवाय सहव्याधी असेलल्या 285 लोकांची तपासणी आणि 65 संशयित रुग्णांचे मोफत एक्स-रे करून क्षयरोगाची तपासणी याठिकाणी करण्यात आली.**

-----------------------------------

फुटपाथ फ्रिडम'

नागपूर शहरातील फुटपाथ हे अवैध पार्किंग आणि खाद्यपदार्थांच्या ठेल्यांनी व्यापले असुन पादचाऱ्यांना चालण्यासाठी मार्गच उरत नाही. या प्रकाराला आळा घालण्यासाठी आता नागपुर पोलिसांचा वाहतूक शाखेकडून 'फुटपाथ फ्रिडम' अभियान राबविण्यात येत आहे. फुटपाथवर अवैध पार्किंग आणि खाद्यपदार्थांचे ठेले लावणाऱ्यांवर पोलिसांकडून कारवाई करीत गुन्हे दाखल केले जात आहे.

-----------------------------------

हवामान

हवामान: गेले काही दिवस विदर्भातील जिल्ह्यांमध्ये सातत्याने किमान तापमानात वाढ होते आहे. नागपुर आणि गडचिरोली त आज तेरा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली तर यवतमाळ मध्ये तेरा पूर्णांक दोन अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, वर्धा, या जिल्ह्यांमध्ये 14 अंश सेल्सिअस ते पंधरा वर्षे सेल्सिअस दरम्यान तापमान आहे. दरम्यान, आगामी काही दिवस हवामान कोरड राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

-----------------------------------